सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या द्वितीय वर्ष कला शाखेच्या (S.Y.B.A.) २०१४-१५ च्या सुधारित अभ्यासक्रमानुसार लिहिलेले क्रमिक पुस्तक, तसेच महाराष्ट्रातील इतर सर्व विद्यापीठांना उपयुक्त.

# राज्यशास्त्र

## (पाश्चात्त्य राजकीय विचार)




संपादक

प्रा. डॉ. कैलास सोनवणे | प्रा. डॉ. राहुल गोंगे

प्रा. डॉ. बाबासाहेब पवार

प्रा. संजय वाकचौरे
प्रा. रविंद्र जोगदंड
प्रा. संजय गायकवाड
प्रा. अनिल मधाळे
प्रा. भरत राठोड



आयडॉल !dol THE TEXT It's all about knowledge

SAT23 Price ₹ 140/-

!dol Publications

Marketed By
Tech-Max Publications

# राज्यशास्त्र (S-1)

## (पाश्चात्त्य राजकीय विचारप्रणाली)

## S.Y.B.A.

## अनुक्रमणिका

### विभाग १


१. प्लेटो — प्रा. डॉ. कैलास सोनवणे — १.१–१.११

१.१ आदर्श राज्य व तत्त्ववेत्ता राजा

१.२ प्लेटोचे शिक्षणाबाबतचे विचार

१.३ प्लेटोचे न्याय व साम्यवादाबाबतचे विचार

२. ॲरिस्टॉटल — प्रा. डॉ. बाबा पवार — २.१–२.१४

२.१ ॲरिस्टॉटलचे राज्यासंबंधीचे विचार

२.२ ॲरिस्टॉटलचे संपत्तीविषयक विचार

२.३ ॲरिस्टॉटलचे क्रांतीविषयक विचारी

३. मॅकियाव्हेली — प्रा. संजय वाकचौरे — ३.१–३.११

३.१ मॅकियाव्हेलीचे मानवी स्वभावाबाबतचे विचार

३.२ मॅकियाव्हेलीचे धर्म व नैतिकतेबाबतचे विचार

३.३ मॅकियाव्हेलीचे राज्य शासनविषयक सिद्धांत

४. जॉन स्टुअर्ट मिल — प्रा. अनिल मधाळे — ४.१–४.१६

४.१ जॉन स्टुअर्ट मिलचे उपयुक्ततावादासंबंधीचे विचार

४.२ जॉन स्टुअर्ट मिलचे स्वातंत्र्याबाबतचे विचार

४.३ जॉन स्टुअर्ट मिलचे प्रातिनिधिक सरकार व राज्याबाबतचे विचार

## विभाग २


५. कार्ल मार्क्स प्रा. डॉ. राहुल गोंगे ५.१–५.१५

५.१ मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद

५.२ मार्क्सचा वर्ग आणि वर्गसंघर्ष

५.३ मार्क्सचे राज्यविषयक विचार

६. थॉमस हॉब्ज प्रा. भरत राठोड ६.१–६.१३

६.१ हॉब्जची निसर्गावस्था

६.२ हॉब्जचे मानवी स्वभावासंदर्भाचे विचार

६.३ हॉब्जचा सामाजिक करार सिद्धांत

७. जॉन लॉक प्रा. रविंद्र जोगदंड ७.१–७.१४

७.१ जॉन लॉकचा सामाजिक कराराचा सिद्धांत

७.२ जॉन लॉकचा नैसर्गिक हक्काबाबतचा दृष्टिकोन

७.३ जॉन लॉकचा नागरी समाज व राज्य याबाबतचा दृष्टिकोन

७.४ जॉन लॉकचे मानवी स्वभावाबाबतचे विचार

७.५ जॉन लॉकचे राज्यशास्त्रातील योगदान

८. रूसो प्रा. संजय गायकवाड ८.१–८.१३

८.१ रूसोची निसर्ग अवस्था आणि रूसोचे मानवी स्वभावाबाबतचे विचार

८.२ रूसोची सामूहिक ईहा-संकल्पना

८.३ रूसोचा सामाजिक करार सिद्धांत

Syllabus

# Politics (S-1)

## Western Political Thought

## S.Y.B.A.

### TERM - I

| Unit | Lectures |
| --- | --- |
| **Unit : 1. Plato**<br>a) Ideal State & Philosopher King<br>b) Views on Education<br>c) Views on Justice & Communism | 12 |
| **Unit : 2. Aristotle**<br>a) Views on State<br>b) Views on Property, Views on Slavery<br>c) Views on Revolution | 12 |
| **Unit : 3. Machiavelli**<br>a) Views on Human Nature<br>b) Views on Religion & Morality<br>c) Theory of Statecraft | 12 |
| **Unit : 4. J.S.Mil**<br>a) Views on Utilitarianism<br>b) Views on Liberty<br>c) Views on Representative Government & State | 12 |

### TERM - II

| Unit | Lectures |
| --- | --- |
| **Unit : 5. Karl Marx**<br>a) Historical Materialism<br>b) Theory of Class & Struggle<br>c) Theory of State & Revolution | 12 |
| **Unit : 6. Hobbes**<br>a) State of Nature<br>b) Views on Human Nature<br>c) Theory of Social Contract | 12 |
| **Unit : 7. John Locke**<br>a) Theory of Social Contract<br>b) Views on natural Rights<br>c) Views on civil society & State | 12 |
| **Unit : 8. Rousseau**<br>a) State of Nature & Views on Human Nature<br>b) Theory of General Will<br>c) Theory of Social Contract | 12 |

प्रकरण

६

# थॉमस हॉब्ज

## (Thomas Hobbs)

६.१ हॉब्जची निसर्गावस्था
६.२ हॉब्जचे मानवी स्वभावासंदर्भाचे विचार
६.३ हॉब्जचा सामाजिक करार सिद्धांत
- ६.३.१ थॉमस हॉब्जचा 'सामाजिक करार' सिद्धांत
- ६.३.२ हॉब्जची सार्वभौमत्वाची संकल्पना
- ६.३.३ हॉब्जप्रणित कायद्याची वैशिष्ट्ये
- ६.३.४ हॉब्जप्रणित आदर्श राज्याचे स्वरूप

### प्रस्तावना

**थॉमस हॉब्ज (इ.स. १५८८ ते इ.स. १६७९) :**

सतराव्या शतकाच्या मध्यात इंग्लंडमध्ये जन्मलेल्या थॉमस हॉब्ज या ब्रिटिश विचारवंताने सामाजिक करारातून समाज आणि राज्याचा उदय झाला असे मत प्रथमच मांडले. त्यामुळे हॉब्जच्या राजकीय विचारांना महत्त्व प्राप्त झाले आहे. हॉब्जच्या प्रसिद्ध सामाजिक करारामुळे त्याला करारवादी विचारवंतांमध्ये अग्रस्थान देण्यात आले होते. त्याच्या कार्यकाळात सामाजिक व राजकीय जीवनात मोठी परिवर्तने घडून येत होती. नवीन राष्ट्रे व राज्यांच्या निर्मितीच्या संकल्पनांवर जनतेकडून भर दिला जात होता. थॉमस हॉब्जच्या राजकीय विचारांवर तत्कालीन सामाजिक व राजकीय व्यवस्थेचा प्रभाव पडल्याचे दिसून येते. हॉब्जला एक बुद्धिजीवी व उपयुक्ततावादी विचारवंत म्हणून ओळखले जाते. हॉब्जने आपल्या सामाजिक करार सिद्धांतामध्ये मानवी जीवन सुखी व समृद्ध करण्यासाठी राज्यव्यवस्थेने प्रयत्नशील असले पाहिजे असे प्रतिपादन केले होते. प्रस्तुत प्रकरणात आपण थॉमस हॉब्जचे निसर्गावस्थेबद्दलचे विवेचन, निसर्गनियमांचे स्पष्टीकरण, सार्वभौमत्वाची संकल्पना, सामाजिक करार सिद्धांत, कायद्यासंदर्भातील विचार, आदर्श राज्यविषयक विचार यांचा अभ्यास करणार आहोत.

युरोपमध्ये १८ व्या शतकात समाजाच्या स्वरूपाविषयी सिद्धात मांडला गेला त्याला सामाजिक कराराचा सिद्धांत म्हणतात. हॉब्जने सामाजिक करार सिद्धांताची पहिल्यांदा मांडणी केली. आधुनिक कालखंडाच्या उदयाच्या टप्प्यावर समाज राज्य संस्था यांच्या अस्तित्वाचे स्पष्टीकरण देण्याचा हॉब्जचा प्रथम प्रयत्न होता. निसर्ग अवस्थेतून माणसाने संघटित जीवन जगताना आपल्याला किमान एक स्वास्थ्य मिळावे यासाठी

समाजाचे संघटन केले. निसर्ग अवस्थेतून संघटित जीवनात प्रवेश करताना प्रत्येक व्यक्तीने सामाजिक कराराचा घटक म्हणून सहभाग घेतला. या सामाजिक कराराचा परिणाम म्हणून सार्वभौम सत्तेचा उदय झाला. अर्थात सार्वभौम सत्ता सामाजिक कराराचा भाग नसल्याने तो स्वतंत्र असतो. सार्वभौम सत्तेच्या आज्ञांचे पालन करणे संघटित समाजावर बंधनकारक असते. थॉमस हॉब्जच्या या सामाजिक करार सिद्धांतांच्या प्रतिपादनाचा उपयोग अनियंत्रित राजेशाहीचे समर्थन करण्यासाठी झाला.

**थॉमस हॉब्जची ग्रंथसंपदा :**

१) डि सिव्ह (De Cive)

२) लेव्हियाथान (Leviathan)

## ०३ ६.३ हॉब्जची निसर्गावस्था
## (Hobbes' State of Nature)

थॉमस हॉब्जच्या सामाजिक कराराच्या सिद्धांताचा पाया 'निसर्गनियमांची संकल्पना' हा होता. थॉमस हॉब्जने निसर्गावस्थेत मनुष्याला आपले रक्षण करण्यासाठी आणि शांततापूर्ण वातावरणात जगण्यासाठी स्वार्थीपणे जगणे भाग होते या गृहीताच्या आधारे निसर्गनियमांची संकल्पना मांडली. प्रत्येकाला आपले रक्षण करण्याचा नैसर्गिक हक्क असून त्यासाठी प्रत्येकाने आपल्या शारीरिक व बौद्धिक क्षमतेचा वापर करणे यालाच हॉब्जचा निसर्गनियम असे म्हटले जाते. निसर्गनियमांचे पालन करण्यासाठी आवश्यक असलेल्या काही मूलभूत नियमांची उदाहरणे हॉब्जने दिली आहेत. त्या नियमांची उदाहरणे पुढीलप्रमाणे :

१) प्रत्येकाने शांतता निर्माण होईल या दृष्टीने प्रयत्नशील असले पाहिजे. मात्र प्रयत्नपूर्वक शांतता प्रस्थापित करण्यात काही अडथळे आल्यास त्यांनी युद्धासाठीही सुसज्ज रहायला हवे.

२) प्रत्येकाने इतरांशी वागताना त्यांनी आपल्याशी कसे वागले पाहिजे याचा विचार करून वागावे.

३) सामाजिक नियमांचे पालन करण्यासाठी परस्परांवर विश्वास ठेवला पाहिजे.

अशाप्रकारच्या नियमांचे पालन केल्यास न्याय प्रस्थापित होईल असे हॉब्जला वाटते. या नियमांचे पालन केल्यास युद्धाला चालना मिळणार नाही, सर्वत्र शांतता प्रस्थापित होईल असे त्याला वाटते. हॉब्जच्या मते निसर्गनियमांच्या आधारे मानवी वर्तनावर नियंत्रण ठेवता येवू शकते.

थॉमस हॉब्ज याच्या निसर्गावस्थेबाबतच्या विचारांचा विकास सामाजिक कराराच्या सिद्धांतामध्ये होतो. राज्य संस्थेची कारणमीमांसा करण्याच्या प्रक्रियेचा पहिला टप्पा म्हणजे निसर्ग अवस्था होय. हॉब्जच्या मते ही निसर्गावस्था अराजकसदृश होती. माणसाचा मूळ स्वभाव स्वार्थी, संशयी असल्याने तो इतरांशी विश्वासाच्या धाग्याने जोडलेला नव्हता. साहजिकच माणसाला सुरक्षित वाटत नव्हते. आपल्या जीविताची, भवितव्याची खात्री वाटत नव्हती. नैसर्गिक स्वातंत्र्य उपलब्ध होते पण त्या चौकटीत मनुष्य ते उपभोगू शकत नव्हता.

राज्यसंस्था निर्माण होण्यापूर्वी मनुष्य नैसर्गिक स्वातंत्र्य उपभोगत होता. व्यक्तीला जीवित वित्त स्वातंत्र्यवादी नैसर्गिक हक्कांची कल्पना होती. मात्र हे निसर्गदत्त हक्क राज्यसंस्थेच्या संरक्षणाशिवाय टिकू शकणार नाही असा अनुभव माणसाला आला. निसर्गावस्थेत व्यक्तीला स्वातंत्र्य व हक्क उपलब्ध होते पण त्यांचे संरक्षण करणारी कोणतीही यंत्रणा उपलब्ध नव्हती. परिणामी मनुष्याने परस्परांशी करार करून राज्यसंस्था निर्माण

केली. राजा हे राज्यसंस्थेचे तत्कालीन स्वरूप होते. मनुष्याने परस्परांशी करार करून आक्रमक अव... राज्यसंस्थेत प्रवेश केला आणि आपले निसर्गावस्थेतील स्वातंत्र्य राजाच्या हवाली केले. निसर्ग अव... कायद्याची हक्काची व त्याची संकल्पना अस्तित्वात असते. एखादी कृती किंवा नियम किंवा समाजातील एखादी संस्था योग्य आहे की अयोग्य हे ठरविणे अवघड नसते. विशिष्ट गोष्ट उघडपणे योग्य किंवा अयोग्य असते आणि प्रत्येकाजवळ असलेल्या विवेकाच्या साहाय्याने प्रत्येकाला या गोष्टीची योग्यायोग्यता दिसू शकते. यावर निसर्गसिद्ध कायद्याची कल्पना आधारलेली असते. हॉब्जने निसर्गसिद्ध कायद्याची आधुनिक मांडणी करताना निसर्गावस्थेतील कायदा दैवी असल्याची कल्पना सोडून दिली. विवेकाऐवजी माणसाच्या स्वहितदक्ष बुद्धिमध्ये निसर्गसिद्ध कायद्याचे अधिष्ठान शोधण्यात आले. मानवी समाज कसा तयार होतो? या प्रश्नाचे उत्तर ईश्वरी योजनेऐवजी निसर्गसिद्ध कायदा असे देण्यात आले. निसर्गसिद्ध कायद्याची कल्पना मांडताना व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांवर भर दिलेला आढळतो.

## ६.३ हॉब्जचे मानवी स्वभावासंबंधीचे विचार (Hobbes' Views of Human Nature)

थॉमस हॉब्जने लेव्हियादान या ग्रंथात मानवी स्वभावाविषयीचे आपले विचार स्पष्ट केले आहेत. हॉब्जने अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार केलेला होता. मानवातील चांगल्या गुणांचा उपयोग करून सुनियंत्रित व सुव्यवस्थित अशी समाजव्यवस्था निर्माण करता येईल असे त्याला वाटत होते. त्यामुळेच त्याने मानवी स्वभावाचा अभ्यास केलेला दिसून येतो. त्या काळात मानवाचा अभ्यास करणारे मानसशास्त्र विकसित झालेले नव्हते. तरी मानवी मेंदूच्या आधारे विज्ञान व तंत्रज्ञान विकसित करून त्यांच्या साहाय्याने मानवी जीवन सुखी आणि समृद्ध करण्यासाठी समाजव्यवस्था व राज्यव्यवस्था कशी असली पाहिजे यासंबंधी विचार मांडले जात होते. त्याचाच आधार घेऊन हॉब्जने आपले मानवी स्वभावाविषयी विचार मांडलेले आहेत.

**अ) थॉमस हॉब्जचे मानवी स्वभावाविषयीचे विचार :**

**१) निसर्गावस्थेतील मानवाची स्वार्थी वृत्ती :**

हॉब्जच्या मते, समाजपूर्व, राज्यपूर्व काळात मानव निसर्गावस्थेत राहत होता. निसर्गतःच मानव हा स्वार्थी व आक्रमक असल्यामुळे स्वतःच्या इच्छा पूर्ण करण्यासाठी प्रत्येक व्यक्ती इतरांवर अन्याय करीत होती. जो शारीरिकदृष्ट्या सबल होता तो दुर्बलांवर आपले वर्चस्व स्थापन करू पाहत होता. मात्र काही शारीरिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती आपल्या कपटनीतीने किंवा युक्त्या-प्रयुक्त्या वापरून प्रसंगी अन्य व्यक्तींची मदत घेऊन विरोधकांवर हल्ला करीत असत. दुर्बल लोकांचे जीवन असह्य झालेले होते. बळी तो कान पिळी अशी परिस्थिती निर्माण झालेली होती. प्रत्येक व्यक्तीला इतरांपासून भीती वाटत होती. त्यामुळे असुरक्षिततेचे वातावरण सर्वत्र निर्माण झालेले होते.

**२) मानवी कृतीमागील प्रेरणा :**

हॉब्जच्या मते, प्रत्येक मानवी कृतीमागे मानवाच्या विशिष्ट इच्छा, आकांक्षा असतात. त्या पूर्ण करण्यासाठी मानव विशिष्ट कृती करत असतो. इच्छापूर्तीसाठी मानवाला जी कृती करावी लागते ती कृती त्याला सुखकारक वाटत असते. मात्र त्या कृतीला बाधा ठरणाऱ्या किंवा विरोध करणाऱ्या घटकांमुळे तो दुःखी होतो. ज्या कृती त्याला दुःखी करणाऱ्या असतात, त्या टाळण्याचा तो प्रयत्न करतो. यावरून असे म्हणता येईल की, मनुष्याच्या विशिष्ट कृती या सुख मिळविणे आणि दुःख देणाऱ्या कृती टाळण्याच्या उद्देशाने केल्या जातात आणि या कृतीद्वारे आपले जीवन सुखी संपन्न करण्याचा प्रयत्न करतो.

**३) स्व-संरक्षणाला महत्त्व :**

मानव हा समाजप्रिय प्राणी आहे असे ॲरिस्टॉटलने म्हटले आहे. मात्र हॉब्जला ॲरिस्टॉटलचे हे मत मान्य नाही. त्याच्या मते मानव हा इतर प्राण्यांप्रमाणेच स्वार्थी असतो. तो केवळ आपल्या सुरक्षिततेला महत्त्व देत असतो. आपल्या सुरक्षिततेसाठी तो समाजात राहतो. समाजात राहत असताना तो स्वःहिताला अधिक प्राधान्य देतो. आपल्या संरक्षणासाठी तो सतत स्वतःजवळ हत्यारे बाळगत असतो. एकमेकांवर अविश्वास दाखविण्याची वृत्ती त्याच्यामध्ये आढळून येते. प्रत्येकजण आपल्या आत्मसंरक्षणासाठी दुसऱ्यांवर आक्रमण करण्याचा प्रयत्न करतो.

**४) सहानुभूती :**

हॉब्जच्या मते मानव हा स्वार्थी असला तरी दुसऱ्याच्या दुःखाबद्दल त्याला सहानुभूती असते. या सहानुभूतीमागे त्याची भावना वेगळीच असते. दुसऱ्या व्यक्तीच्या आयुष्यात जे सुख आलेले आहे तसेच सुख आपल्याही वाट्याला यावे यासाठी तो धडपडत असतो. शिवाय दुसऱ्यावर जी दुःखाची परिस्थिती निर्माण झालेली आहे त्याबद्दल त्याच्या मनात सहानुभूती निर्माण होते. तसे दुःख आपल्या वाट्याला येऊ नये अशी त्याची मानसिकता असते.

**५) निसर्गनियमांचे पालन :**

सत्ता आणि सामर्थ्य प्राप्त करण्यासाठी मानव नेहमी इतरांशी संघर्ष करीत असतो. त्यामुळे सर्वत्र संघर्षमय परिस्थिती निर्माण झालेली असते. मात्र अशी संघर्षमय परिस्थिती मानवाला नको असते. तो नेहमी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी प्रयत्नशील असतो. मात्र ही सुरक्षितता समाजात शांतता प्रस्थापित झाल्यावरच होईल असे त्याला वाटत असल्यामुळे समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण होईल यासाठी तो प्रयत्न करतो. त्यासाठी निसर्गनियमांचे पालन केले जावे असे हॉब्जला वाटते. निसर्गनियमांमध्ये मानवाच्या जीविताचे, संरक्षणाचे हक्क अबाधित ठेवले आहेत. त्यामुळे मानवाने सार्वभौम सत्तेच्या आधारे निसर्गनियमांचे पालन करून आपले जीवन सुखी व संपन्न करावे असे हॉब्जला वाटते.

**अ) थॉमस हॉब्जच्या मानवी स्वभावाच्या विचारांवर झालेल्या टीका :**

**१) सहकार्याची भावना :**

मानव हा निसर्गतःच स्वार्थी व आक्रमक आहे असे हॉब्जने म्हटले आहे. मात्र त्याचे हे विचार योग्य वाटत नाही. कारण आदिमानवापासून ते आधुनिक मानवापर्यंतचा विचार केला तर असे दिसते की मानवाने परस्पर सहकार्याने आपला विकास केला आहे. जर तो स्वार्थी असता तर त्याने इतरांना सहकार्य केले नसते. ही सहकार्याची भावना, बुद्धिचातुर्य यांच्या मदतीने मानवाचे जीवन आज सुखी-संपन्न झालेले दिसून येते.

**२) मानव-समाजप्रिय प्राणी :**

ॲरिस्टॉटलच्या मते, मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. मात्र हॉब्ज त्याच्या या विचाराला विरोध करतो. मानव हा समाजप्रिय प्राणी नाही असे त्याने म्हटले आहे. मात्र मानवी इतिहासाकडे पाहिल्यास लक्षात येते की मानवाची समूहात राहण्याचीच वृत्ती दिसून येते. आपल्या गरजा भागविण्यासाठी तो समूह करून राहतो.

**३) सार्वभौम सत्तेला महत्त्व :**

हॉब्जने निसर्गावस्थेतील मानवाला महत्त्व देत असतानाच सार्वभौम सत्तेचे समर्थन करून अप्रत्यक्षपणे अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार केलेला दिसून येतो. टीकाकारांच्या मते, हॉब्जने सार्वभौम सत्तेला आवास्तव महत्त्व दिलेले आहे.

४) मानवाच्या विवेकबुद्धीकडे दुर्लक्ष :

हॉब्जच्या मते निसर्गावस्थेतील मानवाकडे विवेकबुद्धी नसते. मात्र टीकाकारांना त्याचे हे विधान पटत नाही. आदिमानवापासून ते आधुनिक मानवाने आपल्या विवेकबुद्धीच्या आधारेच आपली प्रगती साधली आहे. आदिमानवापासून ते आधुनिक मानवापर्यंची प्रगती पाहता हे सहज लक्षात येते.

५) सामाजिक कराराची निर्मिती :

हॉब्जने मानवाला स्वार्थी म्हटले आहे. मात्र मानव जर निसर्गतःच स्वार्थी असता, तर त्याच्याकडून सामाजिक कराराची निर्मिती झाली नसती. त्याच्यातील सहकार्याची भावना या करारनिर्मितीस प्रेरणा देते असे दिसून येते. वरीलप्रमाणे हॉब्जने आपले मानवी स्वभावाविषयी विचार मांडले आहेत. त्याच्या मते, निसर्गावस्थेतील मानव स्वार्थी असला, तरी आपल्या संरक्षणासाठी तो धडपडत असतो. आपल्या सुरक्षिततेच्या प्रेरणेतून सर्वांनी एकत्र येऊन सार्वभौम सत्तेची निर्मिती केली आणि या सार्वभौम सत्तेवर आपल्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली. हॉब्जच्या मानवी स्वभावाच्या विचारांवर टीका केली जात असली, तरी मानवाच्या चांगल्या गुणांचा वापर करून समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण करता येईल असे हॉब्जला वाटत होते. त्यासाठीच त्याने सामाजिक कराराचा सिद्धांत मांडून सार्वभौम सत्तेचा पुरस्कार केलेला दिसून येतो.

हॉब्जने पहिल्यांदा निसर्गावस्थेची संकल्पना मांडली. निसर्गावस्थेत माणूस आपल्या पंचेंद्रियांच्या मदतीने वर्तन करीत होता. स्वसंरक्षण आणि स्वास्थ्य यांचे संरक्षण हा या कालखंडातील माणसाचा प्रमुख हेतू होता. मात्र माणसामाणसांत संघर्ष हा अपरिहार्य असतो कारण माणसाच्या या टप्प्यावर प्रगल्भतेबाबत मर्यादा असल्याने तो संशयी, आत्मकेंद्री, क्रूर, स्वमग्न अशा स्वभावाचा होता. अशा संघर्षातून माणसाचा विकास शक्य होत नव्हता म्हणून निसर्गावस्था ही मागासलेली, पशुतुल्य होती. संस्कृतीचा विकास झालेला नव्हता असे हॉब्जचे प्रतिपादन आहे. विवेकाच्या अभावामुळे माणसाचे जीवन अत्यंत संशयी, क्रूर बनले होते. या टप्प्यावर माणूस निसर्गनियमांचे पालन करीत होता. जीवन हे संघर्षाने युक्त असल्याने माणसाला स्वतःची बुद्धी वापरण्याची क्षमता म्हणजे निसर्गनियम होय. प्रत्येकाला स्वतःच्या जीवनाचे संरक्षण करण्याचा अधिकार असेल. त्याला स्वतःचे संरक्षण करण्याचा हक्क असेल हा निसर्गनियमाचा गाभा होय. निसर्गनियमाच्या पालनातूनच व्यक्तीला स्वतःच्या जीवनाची हमी मिळते व यातूनच सामाजिक करार निर्माण होण्याची पार्श्वभूमी तयार होते.

## ६.३ हॉब्जचा सामाजिक करार सिद्धांत (Hobbes' Theory of Social Contract)

थॉमस हॉब्ज याने इ.स. १६४० मध्ये 'De cive' हे पुस्तक हस्तलिखित स्वरूपात प्रकाशित केले. या पुस्तकामध्ये त्याने सामाजिक कराराची संकल्पना मांडली आणि अनियंत्रित राज्यसत्तेचा पुरस्कार केला. त्याने सामाजिक कराराचा जो सिद्धांत मांडला तो सिद्धांत म्हणजे त्याच्या राजकीय विचारांचा मूळ गाभाच होय. थॉमस हॉब्जचा 'सामाजिक करार' सिद्धांत पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल :

### ६.३.१ थॉमस हॉब्जचा 'सामाजिक करार' सिद्धांत :

१) निसर्गनियमांचा आधार :

थॉमस हॉब्जने सामाजिक कराराचा सिद्धांत मांडताना निसर्गनियमांचा आधार घेतलेला दिसून येतो. हॉब्जच्या मते मानव सामाजिक व राजकीय जीवनापूर्वी निसर्गावस्थेत राहत होता. मात्र निसर्गावस्थेतील मानवाचे जीवन

सुरक्षित नव्हते. त्यामुळे मानवाला त्याचे रक्षण करण्याचा नैसर्गिक हक्क होता. त्यासाठी मानव आपली शारीरिक व बौद्धिक क्षमता वापरत असे. यालाच हॉब्ज 'निसर्गनियम' असे म्हणतो. या निसर्गनियमांच्या आधारे मानव आपले निसर्गावस्थेतील जीवन सुरक्षित करण्याचा प्रयत्न करत होता. हॉब्जने अशा निसर्गनियमांचा आधार घेऊन् सामाजिक करार मांडला. किंबहुना त्यांच्या मते, निसर्गनियमांची विकसित अवस्था म्हणजे सामाजिक करार सिद्धांत होय.

**२) जीवित व स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी जाणीव :**

निसर्गावस्थेतील मानवी जीवन हे असुरक्षित होते. हॉब्जच्या मते, निसर्गावस्थेतील मानव हा स्वार्थी होता. आपल्या हक्कांवर अतिक्रमण होऊ नये यासाठी तो संघर्ष करीत असे. त्यांच्या स्वार्थी वृत्तीमुळे सर्वत्र अन्याय, जुलूम, अशांतता पसरलेली होती. त्यामुळे कोणाचेही जीवन सुरक्षित नव्हते. सर्वत्र अराजकता होती. आपल्या इच्छा पूर्ण करण्यासाठी प्रत्येक व्यक्ती दुसऱ्यावर अन्याय करीत होता. एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीपासून असुरक्षित वाटत होते. बलवान व्यक्ती दुर्बलांवर आपले वर्चस्व स्थापन करत होत्या. अशा परिस्थितीला लोक कंटाळले होते. सर्वत्र शांतता, सुरक्षितता निर्माण झाल्याने आपल्या जीविताचे तसेच स्वातंत्र्याचे रक्षण होईल अशी जाणीव लोकांमध्ये निर्माण होऊ लागली.

**३) सामाजिक कराराची संकल्पना :**

निसर्गावस्थेतील परिस्थितीत सुधारणा व्हावी यासाठी शांतता व सुव्यवस्था निर्माण व्हावी याची जाणीव लोकांना होऊ लागली. आपल्याप्रमाणे इतरांनाही जगण्याचा, स्वातंत्र्याचा अधिकार आहे अशी भावना लोकांमध्ये निर्माण झाली. त्यामुळे सर्व लोकांनी एकत्र येऊन करार केला. या कराराला हॉब्जने 'सामाजिक करार' असे म्हटले आहे. निसर्गावस्थेतील प्रत्येक मानवाने आपले नैसर्गिक अधिकार आपल्यातील सर्वश्रेष्ठ व्यक्तीच्या हातात देण्याचे ठरविले. मात्र असे करताना निसर्गावस्थेतील प्रत्येक व्यक्तीने आपले अधिकार सर्वश्रेष्ठ व्यक्तीला दिले आहेत की नाही याची खात्री प्रत्येक व्यक्तीने करून घेतली. तसेच सर्वश्रेष्ठ व्यक्तीच्या आज्ञेप्रमाणे प्रत्येक व्यक्ती वागेल की नाही याचीही खातरजमा करून घेण्यात आली. अशाप्रकारे प्रत्येक व्यक्तीने परस्परांशी करारबद्ध होऊन आपले नैसर्गिक हक्क सार्वभौम सर्वश्रेष्ठ व्यक्तीकडे सुपूर्द केले. मात्र आपले सर्व हक्क सार्वभौम व्यक्तीकडे देत असताना व्यक्तीने आत्मसंरक्षणाचा हक्क स्वत:कडेच ठेवला आहे.

**४) सामाजिक कराराची वैशिष्ट्ये :**

थॉमस हॉब्ज यांचा सामाजिक करार हा राज्याच्या सार्वभौमत्वावर भर देतो. सामाजिक कराराद्वारे निसर्गावस्थेतील व्यक्तींच्या हक्कांच्या संरक्षणासाठी कोणत्या प्रकारची व्यवस्था अमलात आणली जाऊ शकते किंवा सामाजिक कराराचे पालन प्रत्येक व्यक्तीने करावे यासाठी कोणत्या जाणिवा विकसित करण्याची आवश्यकता होती हे हॉब्जच्या सामाजिक कराराच्या वैशिष्ट्यांमधून प्रतित होते.

**अ) लोकसंमती हा कराराचा आधार :**

निसर्गावस्थेतील मानवाला आपल्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी संघर्षमय परिस्थितीशी सामना करावा लागत असे. आपल्या स्वार्थासाठी निसर्गावस्थेतील मानव इतरांवर अन्याय, जुलूम करत असे. इतरांच्या जीविताच्या व संरक्षणाच्या हक्काची जाणीव निसर्गावस्थेतील मानवास नव्हती. त्यामुळे निसर्गावस्थेतील प्रत्येक व्यक्तीचे जीवन असुरक्षित व अस्थिर होते. मात्र निसर्गावस्थेच्या विकसित टप्प्यात आपल्या जीवित व वित्ताची करारबद्ध हमी प्राप्त करून घेण्यासाठी सार्वभौम शक्तीची निर्मिती करण्याचे महत्त्व

मानवाने जाणले होते. या दृष्टीने निसर्गावस्थेतील दुःखद, संघर्षमय व अस्थिर वातावरण संपुष्टात विवेकाधिष्ठित, शांततामय वातावरणात आपल्या जीवित आणि वित्ताचे संरक्षण करण्यासाठी लो जाणीवपूर्वक पद्धतीने सामाजिक करार केला. सामाजिक कराराद्वारे व्यक्तींनी स्वतःवर सार्वभौमत्व नियंत्रणे लादून घेतली. त्यातून राज्यसंस्थेचा उदय झाला. याचाच अर्थ लोकसंमती हा कराराचा आधा आहे.

ब) सर्वसमावेशकता :

सर्वसमावेशकता हे हॉब्जच्या सामाजिक कराराचे दुसरे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. सामाजिक करारात निसर्गावस्थेतील प्रत्येक व्यक्तीने आपापसात करार केला व सर्व व्यक्तींनी मिळून सार्वभौम शक्तीशी करार केला. समाजातील सर्व घटकांच्या परस्परांतील आणि सार्वभौम शक्तीसोबतच्या करारबद्धतेमुळे सामाजिक करार सर्वसमावेशक बनतो. सामाजिक करारांचे पालन करण्यासंदर्भात सामाजिक करारात सकारात्मक दृष्टिकोन बाळगल्याचे दिसून येते.

क) सार्वभौमत्वावरील मर्यादा :

सामाजिक करारांच्या पालनासाठी सार्वभौम सत्तेला निरंकुश व अमर्याद स्वातंत्र्य असावे असे हॉब्ज आपल्या सामाजिक करार सिद्धांतात मत मांडतो. मात्र सामाजिक करारान्वये सार्वभौम सत्तेशी करारबद्ध होताना निसर्गावस्थेतील व्यक्ती आत्मसंरक्षणाचा हक्क स्वतःकडेच ठेवत असत असेही हॉब्ज सांगतो. म्हणजेच व्यक्तीच्या आत्मसंरक्षणाच्या हक्कांची सार्वभौम शक्तींकडून पायमल्ली करण्यावर सामाजिक कराराद्वारे मर्यादा आणल्या जातात.

ड) सार्वभौमत्वाची निर्मिती :

हॉब्जच्या सामाजिक करार सिद्धांतातील सामाजिक करार हा राजा आणि प्रजा यांच्यात झालेला नसतो. निसर्गावस्थेतील प्रत्येक व्यक्तीने परस्परांशी करून सार्वभौम शक्तीच्या निर्मितीस मान्यता दिली. त्यापूर्वी सार्वभौमत्व ही संकल्पना अस्तित्वात नव्हती. मात्र सार्वभौम शक्तीचे स्वरूप हे चिरंतन नसून ती शक्ती केव्हा ना केव्हा तरी नष्ट होऊ शकते असे सामाजिक करारात स्पष्ट केले गेले आहे. सार्वभौम शक्ती नाहीशी झाल्यानंतर व्यक्तीचे जीवन हे निसर्गावस्थेप्रमाणे पुन्हा अस्थिर व अराजकतापूर्ण बनेल असे चित्र सामाजिक कराराच्या भंगाच्या परिस्थितीत दिसू शकते.

इ) स्वसंरक्षण व सुखप्राप्ती :

निसर्गावस्थेतील मानवाला आपल्या जीवनाची शाश्वती नव्हती. निसर्गावस्थेतील व्यक्तीचे जीवन हे अस्थिर व असुरक्षित होते. निसर्गावस्थेतील हे अस्थैर्य व असुरक्षिततेला भेदण्यासाठी तसेच शांतता, स्वसंरक्षणाची हमी व सुख प्राप्तीसाठी प्रत्येक व्यक्तीने आपले अधिकार सामाजिक करारांतर्गत सार्वभौम शक्तीकडे सुपूर्द केले व त्या मोबदल्यात बाह्य आक्रमणापासून संरक्षण, स्वसंरक्षण व सुखदायक संधींच्या प्राप्तीची हमी मिळविली.

ई) जनतेच्या विद्रोहास पायबंद :

सार्वभौम सत्तेविरुद्ध जनतेला विद्रोह करण्याचा अधिकार नसतो. सामाजिक कराराचा भंग जनता करू शकत नाही. कारण त्यामुळे आपले संरक्षण धोक्यात येईल ही भीती प्रत्येकाच्या मनात असते.

फ) राज्यनिर्मिती :

सामाजिक कराराची व्याप्ती हॉब्जने सार्वभौम शक्तीच्या आधारावर स्थापित राज्यापर्यंत वाढविली आहे. हॉब्जच्या मतानुसार सार्वभौमत्वाची प्राप्ती ही दोन साधनांमुळे होत असते. सामाजिक कराराद्वारे

सार्वभौमत्वाचा उदय होतो. तसेच युद्धाच्या मार्गाने विजेता हा पराजितावर सत्ता गाजवून सर्वश्रेष्ठ बनतो. या ठिकाणी लोक स्वेच्छेने एकत्र येत नाहीत.

**ग) सामूहिक हितासाठी केलेला करार :**

सामाजिक करारात वैयक्तिक हितापेक्षा सामाजिक हिताला प्राधान्य दिले गेले आहे. निसर्गावस्थेतील व्यक्तीच्या स्वतःचा स्वार्थ साधण्याच्या प्रवृत्तीमुळे जी अराजकता निर्माण झालेली होती त्या परिस्थितीतून मुक्तता मिळविण्याच्या दृष्टीने लोकांना परस्पर विश्वासाची जाणीव झाली होती. या दृष्टीने वैयक्तिक हितापेक्षा सर्वांनी एकत्र येऊन आपल्या हितासाठी परस्परांच्या मदतीने करार करण्याची जाणीव लोकांमध्ये निर्माण झाली आणि या जाणिवेतून सामाजिक कराराची निर्मिती झाली.

**ह) दैवी शक्ती किंवा धार्मिक मूल्यांना महत्त्व नाही :**

हॉब्जने सामाजिक करार सिद्धांतात कोणतीही धार्मिक मूल्ये किंवा दैवी शक्ती यांना महत्त्व दिलेले नाही. यामुळे या सिद्धांताला व्यावहारिक स्वरूप प्राप्त झाले आहे. हॉब्जच्या मते, भीती दाखवून समाजावर नियंत्रण ठेवण्यापेक्षा सामाजिक करारातून निर्माण झालेली सार्वभौम सत्ता योग्य असून मानवाच्या जीविताचे रक्षण करण्यासाठी त्याची गरज आहे.

थोडक्यात, थॉमस हॉब्जच्या मते सामाजिक करार हे सर्वसमावेशक व सकारात्मक स्वरूपाचे असतात. निसर्गावस्थेतील प्रत्येक व्यक्तींनी आपले कष्टप्रद व संघर्षमय जीवन अधिक सुखकर करण्यासाठी सामाजिक करारांद्वारे परस्परांशी व सार्वभौम शक्तींशी करार करून स्वसंरक्षणाची हमी प्राप्त केली.

**५) सामाजिक करार सिद्धांताचे मूल्यमापन :**

**अ) मानवी गरजेतून राज्याची निर्मिती :**

राज्याच्या उदयासंबंधी दैवी सिद्धांतात राज्याची निर्मिती ईश्वराने केली आहे असे प्रतिपादन केले आहे. मात्र हॉब्जने सामाजिक करार सिद्धांताच्या आधारे राज्य हे ईश्वरनिर्मित नसून मानवी गरजेतून राज्याची निर्मिती केल्याचे स्पष्ट केले.

**ब) कायद्याचे बंधन :**

हॉब्जच्या सिद्धांतात सार्वभौम सत्तेकडे सर्व समाजाच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविलेली आहे. सार्वभौम सत्ता अनियंत्रित व अमर्यादित होती. तिने केलेले कायदे समाजातील सर्व नागरिकांना बंधनकारक होते.मात्र हे बंधन सार्वभौम सत्तेवर नव्हते. म्हणजेच सार्वभौम सत्तेवर कायद्याचे नियंत्रण नव्हते. अशाप्रकारे हॉब्जने एक प्रकारे अनियंत्रित राजेशाहीचाच पुरस्कार केलेला दिसून येतो.

**क) राजसत्तेच्या अधिकाराचे समर्थन :**

व्यक्तीच्या संरक्षणासाठी राज्याची निर्मिती प्रतिपादली गेली. सामाजिक करार म्हणजे मानवी गरजेतून राज्याची निर्मिती झाली. मानवाची गरज पूर्ण करण्यासाठी राजसत्तेला अमर्याद अधिकार असणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन हॉब्जने केले आहे. त्याचे हे विचार आजच्या काळातही उपयुक्त आहेत. कारण सद्यकाळात लोकांच्या गरजा वाढलेल्या आहेत. त्या गरजांची पूर्तता होण्यासाठी राजकीय सत्तेला अधिक व्यापक अधिकार असणे आवश्यक आहे.

**ड) एकांगी :**

हॉब्जच्या मते, निसर्गावस्थेतील मानव स्वार्थी, आक्रमक होता. आपला स्वार्थ साधण्यासाठी निसर्गावस्थेतील मानव हा अन्य व्यक्तींवर आक्रमण करीत असे. त्याला इतरांच्या अधिकार व स्वातंत्र्य हक्कांची जाणीव नव्हती असेही हॉब्जने म्हटले आहे.

इ) अतार्किक :

निसर्गावस्थेतील मानवाला हॉब्जने स्वार्थी म्हटले आहे. शिवाय पुढे जाऊन तो स्वहिताबरोबर सामूहिक हिताला महत्त्व देऊन मानवाने सामाजिक करार अस्तित्वात आणला असेही म्हणतो. त्यामुळे त्याचे विचार अतार्किक वाटतात.

ई) सामाजिक कराराचे बंधन :

सामाजिक करार मानवावर बंधनकारक असल्याचे हॉब्ज म्हणतो. यांचा अर्थ असा की, ज्या मानवांनी मिळून करार केला तो करारच त्यांच्यावर बंधनकारक केला गेला. त्यानुसार मानवाला तो करार रद्द करण्याचा अधिकार नसल्याचे हॉब्ज म्हणतो. वास्तविक मानवाकडून हा करार करण्यात आलेला असल्यामुळे तो करार रद्द करण्याचा अधिकारही त्यांना प्राप्त होणे आवश्यक असते.

उ) व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा :

सामाजिक कराराच्या सिद्धांताने हॉब्जने अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार केला. त्यामुळे सार्वभौम सत्तेला हॉब्जने अनियंत्रित अमर्याद बनविले. त्यामुळे साहजिकच व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा आल्या आहेत. समाजातील सर्व व्यक्तींचे अधिकार गौण मानून सार्वभौम सत्तेला महत्त्व प्राप्त झाले आहे.

वरील सर्व मुद्द्यांच्या आधारे थॉमस हॉब्जचा सामाजिक कराराचा सिद्धांत स्पष्ट होतो. हॉब्जच्या सिद्धांतानुसार मानवी मरजेतून राज्यनिर्मिती झाली. मानवाच्या संरक्षणासाठी सार्वभौम सत्तेचे महत्त्व प्रतिपादन केले गेले. त्याने हा सिद्धांत मांडताना त्याच्या काही बाबी अतार्किक, एकांगी वाटत असल्या तरी त्याच्या या सिद्धांताच्या साहाय्याने राजकीय सत्तेला व्यापक अधिकाराचे त्याने जे समर्थन केले आहे, ते आधुनिक काळातही त्याची गरज प्रतिपादली गेली.

### ६.३.२ हॉब्जची सार्वभौमत्वाची संकल्पना :

थॉमस हॉब्जच्या सामाजिक करार सिद्धांतानुसार सार्वभौम सत्ता ही सामाजिक कराराच्या परिणामांचे फलित आहे. सामाजिक करार करतेवेळी सार्वभौमत्व अस्तित्वात नसल्यामुळे सार्वभौमत्व हा कराराचा पक्ष होऊ शकत नाही व परिणामी सामाजिक करारात सहभागी झालेल्या व्यक्तींचा सार्वभौम सत्तेवर अंकुश राहत नाही.

१) निरंकुश सत्ता :

सार्वभौम सत्तेला निरंकुश अमर्याद स्वातंत्र्याचे अधिकार असतात. त्यामुळे सर्व व्यक्तींना सार्वभौम सत्तेच्या आदेशांचे पालन करणे बंधनकारक असते. मात्र सार्वभौम सत्तेला कोणत्याही व्यक्तीच्या नियम किंवा आदेशांचे पालन करणे अनिवार्य नसते. समाजातील एखाद्या व्यक्तीने सार्वभौम सत्तेच्या विरोधात असंतोष प्रकट केला किंवा सार्वभौम सत्तेची अवज्ञा केली तर त्या व्यक्ती विरोधात दंडात्मक कारवाई केली जाते व त्या व्यक्तीला या कारवाईला सामोरे जाणे बंधनकारक असते.

२) सार्वभौम शक्तींच्या आज्ञेचे पालन :

सामाजिक करार सिद्धांत अस्तित्वात येण्यापूर्वी सार्वभौम शक्तीचा उदय झालेला नव्हता. त्यामुळे सार्वभौम शक्ती ही सामाजिक कराराच्या कोणत्याही स्वरूपातील उल्लंघनासाठी जबाबदार धरली जाऊ शकत नाही. मात्र समाजातील व्यक्तींना सामाजिक करारांतर्गत सार्वभौम सत्तेच्या आज्ञेचे पालन करावेच लागते. कारण सार्वभौम सत्ता नाहीशी झाल्यानंतर व्यक्तीचे जीवन हे निसर्गावस्थेप्रमाणे पुन्हा अस्थिर व अराजकतापूर्ण बनू शकते.

३) स्वेच्छेने सार्वभौमत्वाची निर्मिती :

निसर्गावस्थेतील व्यक्तींनी आपल्या हक्कांचे रक्षण व सुखासाठी स्वेच्छेने सार्वभौमत्वाची निर्मिती केलेली असल्यामुळे सार्वभौम सत्तेच्या आदेशाचे पालन करणे ही प्रत्येक व्यक्तीची नैतिक जबाबदारी असते.

४) दायित्वरहित :

सामाजिक किंवा राजकीय व्यवस्था अस्तित्वात येण्यापूर्वी निसर्गावस्थेत शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी प्रत्येक व्यक्तीने मिळून सामाजिक कराराची निर्मिती केली. सार्वभौम सत्ता या करारान्वये समाजातील संघर्षमय वातावरणाचे निवारण करण्यासाठी नैतिकदृष्ट्या जबाबदार असली तरीही सार्वभौम सत्तेचे व्यावहारिकदृष्ट्या समाजाप्रती कोणतेही दायित्व नसते.

५) व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा घालण्याचा अधिकार :

व्यक्तीला स्वातंत्र्याचे काही निसर्गदत्त व काही मूलभूत अधिकार प्राप्त झालेले असतात. मात्र जर व्यक्तिस्वातंत्र्याच्या अधिकाराद्वारे व्यक्तीने केलेल्या कोणत्याही कृतींमुळे जर समाजव्यवस्थेत असंतोष निर्माण होत असेल, तर सार्वभौम सत्तेला व्यक्तिस्वातंत्र्यावर मर्यादा घालण्याचा अधिकार असतो.

६) निर्णय देण्याचे अधिकार :

समाजातील लोकांच्या समस्या सोडवून त्यावर योग्य तो निर्णय देण्याचा अधिकार सार्वभौम सत्तेला आहे.

७) परकीय धोरणांबाबतचे अधिकार :

हॉब्जच्या मते सार्वभौम सत्ता इतर सार्वभौम सत्तेबरोबर करार किंवा तह करू शकते. प्रसंगी त्यांविरोधात युद्ध पुकारणे किंवा त्यांच्याबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा अधिकार सार्वभौम सत्तेला आहे.

८) नेमणुकीचे अधिकार :

हॉब्जच्या सिद्धांतानुसार सार्वभौम सत्तेची कार्ये सुरळीतपणे पार पाडण्यासाठी काही अधिकाऱ्यांची नेमणूक करण्याचे अधिकार सार्वभौम सत्तेला असतात. उदा. सल्लागार, मंत्री इत्यादी.

९) प्रदत्त अधिकार :

हॉब्जच्या सार्वभौमत्वाच्या संकल्पनेनुसार सार्वभौम सत्तेला वेळप्रसंगी आपले अधिकार तात्पुरते किंवा कायमस्वरूपी इतरांना देण्याचा अधिकार आहे. या अधिकारांना प्रदत्त अधिकार असे म्हणतात.

अशाप्रकारे थॉमस हॉब्जने सार्वभौमत्वाच्या संकल्पनेने राज्यशास्त्रात आपले अमूल्य योगदान दिलेले आहे. त्याच्या मते सार्वभौम ही निरंकुश सत्ता असते. व्यक्तिसमूहाकडून स्वेच्छेने सार्वभौमत्वाची निर्मिती केली जात असल्याने तिला विविध अधिकार प्राप्त झालेले आहेत.

## ⊙ ६.३.३ हॉब्जप्रणित कायद्याची वैशिष्ट्ये :

निसर्गावस्थेतील अराजक परिस्थितीतून मानवाची सुटका व्हावी यासाठी निरंकुश सार्वभौम सत्तेच्या नियमांचा पुरस्कार हॉब्जने केला. सार्वभौम सत्तेने कायदा निर्मिती करून त्या कायद्यांतर्गत समाजावर नियंत्रण प्रस्थापित करावे यासाठी हॉब्जने कायद्याचे महत्त्व प्रतिपादन केले.

१) कायद्याची निर्मिती :

सामाजिक कराराचा सिद्धांत मांडून हॉब्जने सार्वभौम सत्तेचा पुरस्कार केला. सर्व लोकांनी एकत्र येऊन सार्वभौम सत्तेची निर्मिती केलेली असल्यामुळे कायदा करण्याचा अधिकारही सार्वभौम सत्तेकडे दिला गेला. समाजाचे संरक्षण करण्याची जबाबदारी सार्वभौम सत्तेकडे असल्यामुळे समाजात शांतता प्रस्थापित झाल्याशिवाय लोकांना सुरक्षितता प्राप्त होणार नाही असे हॉब्जला वाटत होते. त्यामुळे समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्यासाठी सार्वभौम सत्तेकडे कायद्याची निर्मिती करण्याचा अधिकार दिला जावा असे मत त्याने मांडले.

२) कायद्याची गरज :
निसर्गावस्थेतील मानवी जीवन अस्थिर, असुरक्षित होते. प्रत्येकजण स्वतःच्या स्वार्थासाठी दुसऱ्याचे जीव धोक्यात आणू पाहत होता. त्यामुळे समाजात शांतता व सुरक्षितता निर्माण होण्यासाठी कायदा आवश्यक होता. सार्वभौम सत्तेला कायदा निर्मितीचे अधिकार देण्यात आले. शांततामय सहजीवनासाठी प्रत्येकाने कायद्याचे पालन करणे आवश्यक असल्याचे हॉब्ज सांगतो.

३) कायदे पालन :
सार्वभौम सत्ता जे काही कायदे करेल त्या कायद्याचे पालन सर्व लोकांवर बंधनकारक करण्यात आले होते. मात्र कायद्याची निर्मिती केलेल्या सार्वभौम सत्तेवर या कायद्यांचे बंधन लादले नाही. ती सत्ता बंधनापासून मुक्त होती. याप्रमाणे सार्वभौमाने अनियंत्रित व अमर्याद सत्तेचे समर्थन केले गेले. सार्वभौमावर कोणत्याही व्यक्ती किंवा कायद्याचे नियंत्रण नसते. हॉब्जच्या मते सार्वभौम हा केवळ ईश्वरी न्यायाला जबाबदार असतो.

४) न्यायतत्त्वावर आधारित कायदे :
कायदे करण्याचे अधिकार हॉब्जने सार्वभौम सत्तेला दिले आहेत. सार्वभौम सत्तेने केलेले कायदे हे न्यायावर भर देणारे असावेत. या कायद्यांतून समाजात न्याय प्रस्थापित व्हावा असे त्याला वाटते. मात्र एकीकडे तो अनियंत्रित सार्वभौम सत्तेचा पुरस्कार करतो, ज्या सत्तेवर कोणाचेही नियंत्रण नसते. तर दुसरीकडे कायद्यांचे बंधन त्याने सार्वभौमावर टाकले नाही. अशा परिस्थितीत न्याय्य कायदे सार्वभौम सत्तेकडून होतीलच असे मात्र सांगता येत नाही.

५) कृती स्वातंत्र्य :
शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी सार्वभौम सत्ता कायदे करीत असते. सामाजिक करारामुळे कायद्यांचे पालन लोकांवर बंधनकारक केले गेले. मात्र हॉब्जच्या मते, लोकांच्या ज्या कृतीने कायद्याला बाधा पोहोचत नाही अशा कृतींचे स्वातंत्र्य सार्वभौमाने लोकांना देणे आवश्यक आहे, अन्यथा सार्वभौम सत्ता अडचणीत येण्याची शक्यता असते.

वरील मुद्द्यांवरून हॉब्जचे कायद्याबाबतचे विचार स्पष्ट होतात. त्याने राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी सार्वभौम सत्तेकडे कायदे करण्याचे अधिकार दिले. सामाजिक कराराअंतर्गत सार्वभौमाने न्यायावर आधारित कायदे करण्यावर भर दिला पाहिजे असेही त्याला वाटते.

◈ ६.३.४ हॉब्जचे आदर्श राज्याचे स्वरूप :

थॉमस हॉब्जने 'लेव्हियाथान' (Leviathan) या ग्रंथात आपल्या आदर्श राज्याची कल्पना स्पष्ट केलेली आहे. आदर्श राज्याचे एकूण स्वरूप स्पष्ट करताना त्याने राज्य आणि व्यक्ती यांच्यातील तसेच राज्य आणि धर्म यांच्यातील संबंध लक्षात घेऊन आपले विचार मांडले आहेत.

१) सार्वभौमत्व :
"निश्चित अशा कमी-अधिक भूक्षेत्रावर कायमची वस्ती करून राहणाऱ्या समाजाला स्वतंत्र शासनसंस्था असेल आणि असा समाज अंतर्गत बंडाळी आणि बाह्य आक्रमण यापासून मुक्त असेल तर अशा समाजाला सार्वभौमत्व लाभलेला समाज किंवा राज्य म्हणावे" अशी आधुनिक राज्याची व्याख्या केली जाते. अशा राज्यात सार्वभौमत्व असल्याशिवाय तिला राष्ट्राचे स्वरूप प्राप्त होत नाही. हॉब्जने सार्वभौम सत्तेचा स्वीकार करून अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार केलेला दिसतो. अनियंत्रित राजेशाहीचे समर्थन करण्यासाठी हॉब्जने सामाजिक करार सिद्धांत मांडला. त्याच्या मते लोकांनी आपल्या इच्छेने सार्वभौम सत्तेची निर्मिती केलेली

असल्यामुळे सार्वभौम सत्तेची आज्ञा पाळणे लोकांवर बंधनकारक आहे. मात्र सार्वभौम सत्तेवर कोणत्याही प्रकारचे बंधन असणार नाही असे त्याने स्पष्ट केले. त्याने असेही म्हटले आहे की, सार्वभौम सत्तेच्या विरोधात जाऊन लोकांनी ती सत्ता उलथवून टाकण्याचा प्रयत्न केला तर पुन्हा लोकांना निसर्गावस्थेतील भयानक परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. अशाप्रकारे हॉब्जने आदर्श राज्यात सार्वभौमत्वाला महत्त्व दिलेले दिसून येते. आदर्श राज्याच्या निर्मितीसाठी सार्वभौमत्व आवश्यक असल्याचे त्याने स्पष्ट केले होते.

**२) स्वतंत्र न्यायसंस्था :**

समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्यासाठी कायद्याची आवश्यकता हॉब्जने प्रतिपादली आहे. निसर्गावस्थेतील स्वैराचारी जीवनावर अंकुश ठेवण्यासाठी राजाने केलेले कायदे महत्त्वाचे असल्याचे तो म्हणतो. आदर्श राज्यात कायदे करण्याचे, त्यांची अंमलबजावणी आणि न्यायदान करण्याचे कार्य हॉब्जने राजावर सोपविले आहे. मात्र त्याने ज्याच्यावर कायदा करण्याची जबाबदारी सोपविली त्याच्यावर मात्र कायद्याची बंधने लादली नाही. त्याच्या मते, राजावर कायद्याची बंधने असू नयेत. मात्र कायदा व न्यायाबाबतीत राजाला दिलेल्या सर्वाधिकारामुळे स्वतंत्र न्यायव्यवस्था निर्माण होणे शक्य नाही; परंतु हॉब्जच्या मते, आदर्श राजा कायद्याची निर्मिती, अंमलबजावणी व न्यायदानाचे कार्य व्यवस्थित रीतीने पार पाडू शकतो. म्हणूनच आदर्श राज्यातील न्यायसंस्था ही अन्यायी असू शकत नाही, असे हॉब्जने गृहीतच धरलेले दिसते.

**३) राजसत्ताक शासनपद्धती :**

हॉब्जच्या आदर्श राज्याच्या कल्पनेत त्याने राजसत्ताक शासनपद्धतीला महत्त्व दिले. त्याने राजसत्ताक शासन पद्धतीचा स्वीकार करून या शासनपद्धतीत नैसर्गिक कायदे, नागरी कायदे आणि नैसर्गिक हक्क यांना महत्त्व दिले. समाजात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी समाजाचे, राज्याचे संरक्षण करण्यासाठी राजसत्ताक शासनपद्धती आवश्यक असल्याचे त्याने म्हटले आहे. हॉब्जच्या मते राजसत्ता शासनपद्धतीत सार्वजनिक हितसंबंध खासगी हितसंबंधांशी निगडित असतात. राज्यातील लोक असंतुष्ट असतील तर राजाही संतुष्ट असू शकत नाही असे तो म्हणतो. ज्या राज्यातील प्रजा गरीब असते त्या राज्यातील राजा हा श्रीमंत असूच शकणार नाही असे तो म्हणतो. इतर शासनपद्धतीत व्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्व दिल्यामुळे तिथे त्याचे विचार व्यक्त होण्यासही पुरेशी संधी मिळत असते. विचारांमधील मतभेदामुळे विसंवाद निर्माण होण्याची शक्यता असते. मात्र राजसत्ताक शासनपद्धतीत विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य नसल्यामुळे राज्याच्या निर्णयात विसंवाद निर्माण होण्याची शक्यताच नसते कारण या शासनपद्धतीत सर्व निर्णय घेण्याचे अधिकार राजाकडेच असतात. त्यामुळे वैचारिक भेद निर्माण होण्याचीही शक्यता नसते असे हॉब्जचे म्हणणे आहे.

वरील मुद्द्यांच्या आधारे हॉब्जने आदर्श राज्याचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याने सामाजिक कराराचा सिद्धांत मांडून राज्याच्या उदयासंबंधी आपले विचार मांडले. त्याने आदर्श राज्यासाठी सार्वभौमत्व, स्वतंत्र न्यायव्यवस्था आणि राज्यसत्ता शासनपद्धती हे घटक महत्त्वाचे मानले आहे. तसेच आदर्श राज्यात धर्म आणि व्यक्तीची भूमिकाही स्पष्ट केली आहे.

***

## सरावासाठी प्रश्न

**प्र.१. खालील प्रश्नांची २०० शब्दांत उत्तरे लिहा.**

१. हॉब्जची सार्वभौमत्वाची संकल्पना स्पष्ट करा. (Refer Sub Point 6.3.2)

२. थॉमस हॉब्जचे मानवी स्वभावाविषयीचे विचार व त्यावर झालेल्या टीका स्पष्ट करा. (Refer Point 6.2)

३. थॉमस हॉब्जच्या आदर्श राज्याचे स्वरूप स्पष्ट करा (Refer Sub Point 6.3.4)

४. हॉब्जप्रणित कायद्याची वैशिष्ट्ये लिहा. (Refer Sub Point 6.3.3)

५. थॉमस हॉब्जच्या सामाजिक कराराची वैशिष्ट्ये सांगा. (Refer Sub Point 6.3.1)

**प्र.२. खालील प्रश्नांची ४०० शब्दांत उत्तरे लिहा.**

१. थॉमस हॉब्ज याचा 'सामाजिक करार' सिद्धांत स्पष्ट करा. (Refer Sub Point 6.3.1)